प्रा. कुमुदताई हिरुरकर

अमरावती हे शहर संगीताच्या संदर्भात अतिशय संपन्न शहर आहे. या शहरात येणाऱ्या कलाकाराला आपली कला सादर करताना समोर बसलेल्या श्रोत्यांचाही दबदबा वाटतो. गायन, वादन, नृत्य, संगीत दिग्दर्शन, लेखन, संगत या सर्व क्षेत्रांमधे अमरावती हे शहर अभिरुची संपन्न मानले जाते. या शहराची सांस्कृतिक अभिरुची घडवण्यात काही व्यक्तीचे महत्त्वाचे योगदान आहे. आदरणीय प्रा कुमुदताई हिरुरकर हे त्यापैकी एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व.

'पुष्पे कमळे फुलति प्रभाती, सगळी सूर्यविकासी ।

कुमुद कमळ परि ताप न साहे, शीतल चंद्रविकासी ।

कुमुद म्हणजे चंद्रोदयाबरोबर उमलणार कमळ. चंद्राप्रमाणेच शांत, तेजस्वी परंतू कोमल, शीतल. प्रा.कुमुदताई हिरुरकरांचे व्यक्तिमत्वही असेच शांत, निर्मल, कोमल आहे, अनेकांना प्रेरणादायी आहे. विदर्भ महाविद्यालयातून संगीतात एम.ए. करीत असताना १९८८ व १९८९ साली दोन वर्ष सलगपणे मी रोज कुमुदताईकडे शिकायला जात असे. या दोन वर्षांमधले शिक्षण साहजिकच एम.ए. चा अभ्यासक्रम डोळ्यापुढे ठेवून झाले असले तरी ते केवळ परीक्षेपुरते निश्चितच नव्हते . या दोन वर्षात कुमुदताईकडून मला जे शिकायला मिळले ते विविधांगी होते, कायमस्वरूपी होते. मला विविध दृष्टींनी 'डोळस' बनवणारे ठरले .

माझ्या लहानपणापासून कुमुदताई आमच्या घरी येत असलेल्या मला आठवतात. मीही वडिलांबरोबर, आईबरोबर त्यांच्याकडे अनेकदा जात असले तरी माझे आणि त्यांचे खरे नाते त्या शिक्षिका आणि मी त्यांची विद्यार्थिनी असे अधिक जुळले. अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयात त्या अध्यापनाचे कार्य करीत तेंव्हा मी त्यांची विद्यार्थिनी होते. संगीत क्षेत्रात गुरू आणि शिष्याचे नाते रूढ आणि परिचयाचे आहे. स्वाभाविकच महाविद्यामयीन शिक्षणातले शिक्षक आणि विद्यार्थी हे नाते संगीत क्षेत्राने फारसे आपलेसे केलेले नाही.

कुमुदताईशी माझे नाते मुख्यतः शिक्षक-विद्यार्थिनीचे होते .आजही ते त्याच तऱ्हेचे आहे हे मी विशेष अभिमानाने ठासून सांगेन.

गुरुशिष्याच्या नात्यात दुर्लक्षिले गेलेले, न जाणवलेले अनेक पैलू मला या नात्यात जाणवले आहेत. माझ्या आई -वडिलांनी मला कुमुदताई हिरुरकर यांच्याकडे शिकायला अत्यंत विचारपूर्वक पाठवले असणार. वडिलांप्रमाणेच कुमुदताई अत्यंत डोळस, स्पष्ट व नेमक्या, स्वतःचा विचार असलेल्या, दुस-याच्या विचारांचा व व्यक्तिमत्त्वाचा आदर करणाऱ्या होत्या .हिरुरकरांचे संपूर्ण कुटुंबच त्या काळात माझ्यावर कळत-नकळत संस्कार करीत होते. प्ररवर सामाजिक भान अमलेले, स्वतःची सामाजिक बांधीलकी ओळखणारे, साधे परंतु शिस्तीचे, सुसंस्कृत, बुद्धिवादी परंतु भावनांचे मोल जाणणारे , स्पष्टवक्ता परंतु नम्र, विविध क्षेत्रातली वेगवेगळी व्यक्तिमत्वे असणारे, त्या प्रत्येकाच्या व्यक्तिमत्वाचा आदर करण्याचे महत्त्व जाणणारे , खऱ्या अर्थाने हे मोठे एकत्र कुटुंब माझ्यावर अनेक संस्कार करीत होते.

कुमुदताई उत्कृष्ट गायिका म्हणून ओळखल्या जात. 'गीतगोविंदातली श्री. मनोहरराव कवीश्वरांची गाणी गाणाऱ्या अगदी पहिल्या गायिका म्हणून त्या मला माहीत होत्या.परंतु शास्त्रीय संगीताच्या मैफिलीतले त्यांचे गाणे ऐकण्याचा योग मला आला नाही. खरे म्हणजे त्या हाडाच्या शिक्षिका आहेत. विद्यार्थ्यांच्या संपूर्ण व विविध अंगांनी होणाऱ्या विकासाकडे लक्ष देणाऱ्या जागरूक मार्गदर्शक आहेत. स्वतःच्या वागण्यातून संस्कार घडवणाऱ्या गुरु आहेत. विद्यार्थ्यांच्या अडचणी ओळखून त्याच्या क्षमतांच्या आधारे शिकवू शकत. प्रत्येक विद्यार्थ्याचा स्वाभाविक कल शोधून त्याच्या गुणांना त्या जाणत. आपल्या विद्यार्थी किंवा शिष्यांनाही त्या आपले गाणे शिकवत नाहीत. याउलट त्याचे स्वतःचे गाणे शोधायला शिकवतात. स्वतःचे गुण ओळखायला शिकवतात. स्वतःचे दोष ओळखून ते दूर करायला मदत करतात. शास्त्रीय संगीताची शुद्धता, संगीताच्या शास्त्राचा काटेकोरपणा आणि सुगम संगीताचे लालित्य अनेक बाजूनी शिकवतात. काळाच्या कसोटीवर पारखलेली गुरुशिष्य अध्यापन पद्धती आणि काळाच्या

संदभीत तुलनेने नवी असलेली महाविद्यालयीन समूह शिक्षण पद्धती या दोन्हीचा अत्यंत विचारपूर्वक मेळ हिरुरकर मॅडममधे सापडतो.

एम ए च्या वर्गामधले अनेक विद्यार्थी मॅडमच्या घरी नोट्स काढायला म्हणून आवर्जून जात. मॅडमचे स्वतःचे सुसज्ज ग्रंथालय आहे. त्यात नवनवीन तसेच जुनी प्रकाशित पुस्तके आहेत. काही दुर्मिळ ग्रंथ आहेत, अनेक मासिके आहेत. संगीत या मासिकाचे, संगीत कलाविहाराचे अंक, म्युझिकॉलॉजीशी संबंधित जर्नन्सचे अंक आहेत. अनेक महत्त्वाच्या स्मरणिका आहेत. विविध ठिकाणी प्रकाशित महत्त्वाच्या लेखांच्या झेरॉक्स प्रती आहेत. अनेक महत्त्वाचे शब्दकोष, ज्ञानकोष आहेत. हे सगळे साहित्य नीट नोंदी करून व्यवस्थित लावलेले आहे. मुख्य म्हणजे घेऊ शकणाऱ्यांसाठी हे ग्रंयालय सदैव खुले असायचे. त्यामुळे मॅडम कडे तासनतास बसून नोट्स काढतांना चहा फराळाच्या आदरातिथ्याचे भाग्य माझ्यासारख्या अनेकांना लाभले. पुस्तकांमधून मिळालेले हे शिक्षण केवळ एम.ए.च्या परीक्षेपुरते मर्यादित राहिले नाही. पुस्तक हाताळायला मिळल्यामुळे पुस्तकांच्या वाचनाची गोडी लागली. अनुक्रमाणिकेपासूनच विषयांची माहिती झाली. पुस्तकांमधले लेख चाळता चाळता अनेक लेखकांशी ओळख झालीली. त्यांच्या भाषेचा, शैलीचा प्रभाव खोलवर रुजत गेला. नोट्स काढण्याचे तंत्र अनेकांना माहीत नसते. मॅडमकडून ते मला समजून घेता आले. संशोधनासाठी किंवा एरवीही लेखनासाठी संदर्भ गोळा करावे लागतात. ही प्रक्रिया दीर्घ असते. लेखनासाठी, संशोधनासाठी संदर्भ गोळा करण्याची सुरवात माझ्याप्रमाणे अनेक विद्यार्थ्यांनी इथेच केली असावी. पुस्तक, मासिक ही केवळ शाळा कॉलेजच्या किंवा इतर ग्रंथालयांमधून आणून वाचण्याची वस्तू नव्हे. ती स्वतः. प्रसंगी काटकसर करून पैसे जमवूनही विकत घ्यायची असतात हे अनेकांच्या मनावर बिबवले .

स्वतःला नेहमी लागणाऱ्या कॅसेट्स केव्हाही वापरता याव्यात यासाठी त्या विकत घेऊन, डबिंग करून घेऊनत स्वतः जवळ असाव्यात ही गोष्ट मॅडमनी आम्हा विद्यार्थ्याच्या मनावर ठसवली. त्यामुळे आपोआपच एकमेकांच्या

वाढदिवसाच्या, दिवाळीच्या भेटी कॅसेट्सच्या किंवा पुस्तकांच्या रूपात दिल्या जाऊ लागल्या. पुस्तकं आणि कसेटच्या खजिना असण्याची 'श्रीमंती' मॅडममुळेच आमच्या मनावर कोरली गेली. मॅडमचा कॅसेट्सचा संग्रह मोठा आहे. त्यात सिनेसंगीतापासून धृपदापर्यंत सर्व शैलींच्या कॅसेट्स आहेत. माझ्या आठवणीप्रमाणे काही स्पूल्स ही त्यांच्याजवळ आहेत. गाण्याप्रमाणे चर्चांच्या, व्याख्यानांच्या कॅसेटस आहेत. अनेक कॅमेट्स मी मॅडमच्या सोबतीने ऐकल्या आहेत. संपूर्ण एकाग्रतेने गाणे ऐकत असताना मॅडमची हलकीशी वाहवा गाण्यातले सौंदर्य अधोरेखित करायची. काय ऐकायचे आणि ते कसे ऐकायचे याचे मार्गदर्शन मॅडम अधूनमधून करीत. मॅडमच्या घरी वरच्या मजल्यावर बुद्धीबळाच्या पटासारख्या काळ्या-पांढऱ्या चौकोनी टाईल्सच्या हॉलमधे बसून मॅडमच्या सोबतीनं कॅसेट्स ऐकताना ती कॅसेट एखाद्या मैफिलीसारखी जिवंत भासायची.

मॅडमचं स्वतःचं ग्रंथालय अन् कॅसेट्सचे भांडार सुसज्ज आहे. त्याचे वर्गीकरण कल्पक अन् नीटनेटके आहे. त्यातल्या नोंदी आणि क्रम शिस्तबद्ध आहेत. वर्गीकरण, नोंदी करणे, कॅटलॉग्ज बनवणे, लेखांच्या विषयानुरूप फाइल्स बनवणं या सर्व आवश्यक गोष्टी मला त्यांनी शिकवल्या. आयुष्यभर पुरणारे, मौल्यवान सर्वत्र कामास येणारे शिक्षण मॅडमच्या सहवासात मला मिळाले. क्षमताधीष्टीत अभ्यासक्रमाची चर्चा आज शिक्षण क्षेत्रात सर्वत्र व सदैव केली जाते. शिकायचे ते क्षमता निर्माण करण्यासाठी असा प्रयत्न त्या काळीही मॅडम नेहमीच करायच्या. रागाच्या शुद्धतेबाबत मॅडम अतिशय जागरूक आहेत. म्हणूनच रागाचे नियम माहीत करून घ्यायला त्यांनी शिकवले.अनेक पुस्तकांमधून माहिती गोळा करतांना मतमतांतरे, त्यामागचे विचार, त्यांचे स्पष्टीकरण जाणून घ्यायचे; बंदिशींचा व प्रत्यक्ष गाण्याचा आधार घ्यायचा अशी चौफेर पद्धत शिकवली. अशा विविध मतांमधून स्वतःचे मत बनवतांना 'मला अनुकूल ते खरे आणि बाकी सब झूट असते' असे मानणे कसे चूक असते हे सांगितले आणि परमताचा आदर करण्याचे आणि मतभिन्नतेचाही आदर करण्याचे मूल्य माझ्यात रुजत गेले .

मॅडम एम ए च्या वर्गाना एम ए च्या दर्जानेच शिकवीत. बांधीव आलाप ताना तर कधीच्याच बाद होत्या; उलट बंदिशीचं सौंदर्य उलगडून सांगतांना बंदिशी जशाच्या तशा गाण्यामागची भूमिका आणि बंदिशींमधे बदल करण्याच्या जागा स्पष्ट करीत. रागांची नेमकी स्वरुपे, एका रागातून दुसऱ्या रागात जाण्याच्या वाटा, तीन ते चार स्वरात रागाचा गाभा गाठणे या सगळ्याची तयारी वर्गातही करवून घेत, रागाच्या माहितीचे चार्टस, बंदिशींच्या स्वरालपीची माहितीची लघुलिपी असे अभिनव प्रकार मॅडम आम्हा सगळ्यांकडून करवून घेत असत,

मॅडमचे थिअरीचे वर्ग विशेष रंगत. झटपट गुण मिळवून देण्यासाठी वरवरच्या तयार नोट्स त्यांनी कधीच दिल्या नाहीत. ग्राम - मूर्छना, मेजर-मायनर--सेनिटोन, पाश्चात्य स्वरालिपी, खंडमेरू यासारखे किचकट वाटणारे खास शास्त्रपक्षाचे विषय मॅडम चिकाटीने शिकवत. त्याचबरोबर संगीत आणि मानसशास्त्र, पाश्चात्य संगीताचा हिंदुस्थानी संगीतावर प्रभाव असे विषयही अत्यंत कल्पकतेने शिकवत.त्यावर चर्चा करीत आम्हालाही बोलके करीत . पाचात्य संगीत, घराण्यांची संकल्पना कल्पकतेने शिकवत. त्या चर्चांची टिपणे वाचताना आजही त्या रंगलेल्या चर्चा व वादविवाद आठवतात.

जयपूर घराण्यातील ज्येष्ठ गायिका गुरुवर्य पद्मावती शाळीग्राम यांच्या मॅडम शिष्या आहेत. मॅडमनी माझ्यावर जयपूर घराण्याचे अतिशय खोलवर संस्कार केले. जयपूर गायकीची ओढ निर्माण केली. जयपूर घराण्यामधले बंदिशीचे महत्त्व त्यांनी पटवलले. उपज करण्याचे तंत्र, रागाचे संपूर्ण स्वरूप व्यक्त करणारे आलाप मांडण्याची कल्पना, दोन मात्रांच्या आघातांमधल्या अवकाशाचा उपयोग करण्याचा विचार त्यांनी मला दिला. मॅडमनी शिकवलेल्या विशेषत: विलंबितातल्या बंदिशी आजही जशाच्या तशा आठवतात. त्यामागचा सौदर्यविचारही आठवतो. रियाजात मेट्रोनोम सारख्या लय-यंत्राचा वापर करून आघात-अनाघात अवग्रह - विराम यांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. आघातांच्या स्थानांप्रमाणेच अनाघाताच्या स्थानांमधून निघणारी सूत्रे शिकवली.

मॅडम सुट्ट्यांमध्ये मुंबईला राहून पद्मावती शालीग्रामांकडून तालीम घेतात याचे मला खूप अप्रूप वाटायचे. गुरूंकडे कडे रोज, नियमित तालीम घेण्याचे किंवा गुरूंच्या सहवासात राहून संगीताची नियमित तालीम घेण्याचे महत्त्व संगीताच्या क्षेत्रात नवीन नाही. परंतु बर्षाकाठी जेमतेम दोनतीन महिने गुरूंच्या सानिध्यात राहूनही संगीताची नीट तालीम घेता येते याची प्रेरणा मला मॅडमच्या उदाहरणाने घेता आली. गुरूंकडे जाऊन नेमके कसे संस्कार घ्यायचे, ते कसे पचवायचे, त्याचा कसा उपयोग करून घ्यायचा, विचार कसा करायचा याचा विचार मी माझ्या गुरुच्या संदभीत करते तेव्हा गुरुशिष्य अध्ययन पद्धतीचा हा नवा पैलू माझ्या लक्षात येतो. गाण्याचा विचार, गाण्यातली कल्पकता, अभ्यासाची मूल्ये आणि तंत्र या गोष्टी प्रत्यक्ष गाण्याइतकीच महत्त्वाची असतात हे मॅडमनी साष्ट केले.

माझ्या वडिलांनी मला कुमुदताईकडे शिकायला अत्यंत विचारपूर्वक पाठवले असणार कारण गाण्याप्रति प्रेम आणि निष्ठा हयाबरोबरच स्पष्ट नेमके विचार, गाण्यातली अभ्यासाची मूल्ये, कल्पकता, प्रतिभा आणि साधना यांचे अनोखे रसायन मला कुमुदताई हिरुरकर या व्यक्तीत सापडायचे.

आता मीही महाविद्यालयीन संगीत अध्यापनाच्या क्षेत्रात आहे, मी ज्या वयाची असताना मॅडमनी इतके विविधांगी संस्कार घडवले त्याच वयाची मुलंमुली माझ्यासमोर शिकायला बसलेली असतात तेव्हा मीही साहजिकच माझ्या शिक्षकांची आठवण होत असते. मी माझ्या शिक्षकांच्या वाटेवर चालून बघते. शिक्षक म्हणून स्वतःच्या जबाबदा-या आणि मर्यादा यांचे भान येऊ लागते. आत्मसंशोधन, आत्मनिरीक्षण होऊ लागते, याची परतफेड कशी करता येईल याचा विचार करताना विंदा करंदीकरांची कवितेतल्या काही ओळी आठवतात.

देणाऱ्याने देत जावे

घेणाऱ्याने घेत जावे

घेता घेता एक दिवस

देणाऱ्याचे हात घ्यावे